मोटार वाहन परवाना (Permit)
धारकांकडील थकीत व्यवसाय करासाठी
सवलत योजना-
"व्यवसाय कर अभय योजना-२००९"

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक-व्यकर-१००९/प्रक्र.२३/कराधान-३,
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
दिनांक: २९ जून २००९

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोक-या यावरील कर अधिनियम, १९७५ (व्यवसायकर कायदा, १९७५) अन्वये व्यवसाय कर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्ती, संस्था आणि आस्थापना यांनी विहित कालावधीत नांव नोंदणीकरण (Enrollment) करुन घेवून व्यवसाय कर भरणे बंधनकारक आहे. नांव नोंदणीकरण करण्यास अथवा देय व्यवसाय कर भरण्यास विलंब झाल्यास उक्त कायदयामध्ये व्याज, दंड, शास्ती आकारण्याची तरतूद आहे व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र.१३ अन्वये मोटार वाहन परवानाधारकांना मोटार वाहनांच्या प्रकारानुसार रु. ७५० ते २५०० व्यवसाय कराचा भरणा करणे आवश्यक असते. साधारणतः मोटार वाहन परवान्यांचे नुतनीकरण करताना व्यवसाय कराचा भरणा करुन घेण्यात येतो. याबाबत शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, अद्यापही या परवानाधारकांकडे व्यवसाय कराची थकबाकी मोठया प्रमाणात शिल्लक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या व्यवसाय कर थकबाकीदारांना त्यांचेकडील थकबाकी भरताना अभय योजनेव्दारे सवलतीची शेवटची संधी देण्याचे मा.वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या वर्ष २००९-१० च्या अर्थसंकल्पिय भाषणात प्रस्तावित केले होते. या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

२. व्यवसाय कर कायद्याअंतर्गत अनुसूची एक खालील नोंद क्र. १३ अन्वये मोटार वाहन परवाना धारक व्यावसायिकांसाठी "व्यवसाय कर अभय योजना २००९" घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार मोटार वाहन परवानाधारकांकडे प्रलंबित असणा-या वित्तिय वर्ष २००६-०७ पर्यंतचा व्यवसाय कर भरण्यासाठी ही अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा कालावधी, अटी, सवलती आणि कार्यपध्दती खालील प्रमाणे असेल.

**क) अभय योजनेचा कालावधी :-**

व्यवसाय कर अभय योजना-२००९ ही दिनांक १ जुलै २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीसाठी मर्यादित आहे.

**ख) अभय योजनेच्या अटी :-**

१. मोटारवाहन परवानाधारकांनी व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र. १३ अन्वयेच्या एकूण थकबाकी पैकी दिनांक १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७ पर्यंतच्या कालावधीचा व्यवसाय कर संपूर्णपणे भरणे आवश्यक राहील. त्याचबरोबर या कालावधीतील देय व्याज, शास्ती किंवा दंड यांच्या देय रकमेपैकी १०% रक्कम दिनांक ३१/१२/२००९ पर्यत भरणे आवश्यक आहे.

२. अभय योजनेखालील सवलतीचा लाभ हा दिनांक १ जुलै २००९ रोजीच्या कराच्या थकबाकीसाठी आणि अनुषंगिक व्याज, दंड व शास्ती यासाठी असेल.

३. व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र.१३ खालील परवानाधारकांनी एखाद्या कालावधीसाठी व्यवसाय कर आकारणी विरोधात अपील दाखल केले असेल व त्यांना सदर कालावधीसाठी अभय योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल तर असे अपील मागे घेणे बंधनकारक राहील.

४. या योजनेच्या आधारे अर्जदारास कोणत्याही प्रकारच्या परताव्याचा दावा करता येणार नाही किंवा असा परतावा दिला जाणार नाही.

**ग) अभय योजनेखालील सवलती :-**

वर नमूद केलेल्या अटींची पूर्तता केल्यास अर्जदारास पुढील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

१. दिनांक ३१/३/२००२ पर्यंतच्या सर्व कालावधीसाठी थकीत असलेला व्यवसाय कर, त्यावरील व्याज, दंड आणि शास्तीची संपूर्ण रक्कम माफ करण्यात येईल.

२. दिनांक १/४/२००२ ते ३१/३/२००७ पर्यतच्या कालावधीसाठीच्या देय करावरील व्याज, दंड, शास्ती यांच्या रकमेच्या ९०% रक्कम माफ करण्यात येईल.

**घ) अभय योजनेखाली अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

या योजनेतील सवलतीचा लाभ घेण्यासाठी मोटार वाहन परवानाधारकाने अभय योजनेच्या कालावधीत संबधित परिवहन अधिका-यांकडे सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज करणे बंधनकारक आहे. अर्जासोबत अभय योजनेप्रमाणे देय कर, व्याज, दंड आणि शास्ती भरल्याचे पुरावे

सादर करणे आवश्यक असेल. तसेच अपिलात असलेल्या कालावधीसाठी अभय योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास अर्जा सोबत अपील मागे घेतल्याचा पुरावा जोडणे आवश्यक राहील.

च) ही योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सर्व अधिकार परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत. त्यांना हे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रात दुय्यम अधिका-यांना देण्याचे अधिकारही प्रदान करण्यात येत आहेत.

छ) योजनेतील तरतूदी व अटींबद्दल काही शंका अथवा प्रश्न उपस्थित झाल्यास याबद्दल निर्णय देण्याचा अधिकार परिवहन आयुक्त यांचा राहील.

ज) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०६२९१५३९२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( चित्रा कुलकर्णी )
**विशेष कार्य अधिकारी, वित्त विभाग**

प्रत:-

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८ वा मजला, माझगांव, मुंबई-४०० ०१०
२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, उपनगरीय प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला, डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ६ वा मजला, विधान भवन, मुंबई-३२.
१०) निवड नस्ती, कराधान-३.

**<u>अर्जाचा नमुना</u>** **<u>व्यवसाय कर अभय योजना, २००९</u>**

प्रति,

प्रादेशिक परिवहन अधिकारी.

_______________________

विषय : व्यवसाय कर अभय योजना, २००९ खाली सवलत मिळणेबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्रमांक: व्यकर-१००९/प्र.क्र.२३/कराधान-३,
दिनांक : २९ जून, २००९.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये शासनाने जाहीर केलेल्या व्यवसाय कर अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी मी खालील तपशीलासह अर्ज सादर करीत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ) परवानाधारक व्यावसायिकाचे नाव | | | | | |
| | ब) पत्ता | | | | | |
| २ | मोटार वाहन परवाना (Permit) क्रमांक | | | | | |
| ३ | व्यवसायकर कायद्याखालील नावनोंदणी क्रमांक | | | | | |
| ४ | थकीत रकमेचे विवरण | | | | | |
| | अ.क्र | वर्ष | थकीत रक्कम (दिनांक १.७.२००९ ची स्थिती) | | | |
| | | | मूळ कर | व्याज | शास्ती / दंड | एकूण |
| | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| | ६ | | | | | |
| | ७ | | | | | |
| | | एकूण | | | | |
| ५ | अभय योजनेखाली भरण्यात करण्यात आलेली रक्कम | | | | | |
| | अ.क्र | वर्ष | कर | व्याज | शास्ती / दंड | एकूण |
| | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| | ६ | | | | | |
| | ७ | | | | | |
| | | एकूण | | | | |

अभय योजनेच्या सर्व अटींची पूर्तता मी केली असून, या योजनेखालील सवलतीचा लाभ देण्यात यावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

दिनांक :

ठिकाण :

(अर्जदाराची स्वाक्षरी)